| | |
|---|---|
| MHLA120013452026 | **फौ.किरकोळ अर्ज नं.१२२/२०२६ मधील निशाणी क्रं.१ खालील आदेश.**<br>(सुधा मारुती वाघमारे विरूध्द महाराष्ट्र सरकार तर्फे शिरुर निलंगा पोलीस ठाणे.) |

अर्ज वाचला. तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.५ लगत दिलेले म्हणणे वाचले.

२. अर्जदार हे मौजे निलंगा, ता.निलंगा, जि.लातूर येथील रहिवासी आहेत. दिनांक ०९.०४.२०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी चोरी झाली होती. आरोपींनी फिर्यादीच्या मालकी व ताब्यातील १५ ग्रॅमचे–सोन्याचे मिनी गंठण, १ तोळा–सोन्याचे लॉकेट, १ तोळा–अंगठी, ५ ग्रॅमची–अंगठी, ९ ग्रॅमचे–सोन्याचे झुमके, २ ग्रॅम– कानातील टॉपस, २ ग्रॅम– सोन्याचे सरपाळे आणि ७ ग्रॅम– सोन्याचे मनीमंगळसुत्र इत्यादी वस्तु चोरीला गेल्या होत्या. सदर चोरीस गेलेला मुद्देमाल परत मिळावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वरील मुद्देमाल वरील मुद्देमालपैकी १० ग्रॅम–सोन्याची अंगठी, ५ ग्रॅम– सोन्याची अंगठी, ९ ग्रॅमचे–सोन्याचे झुमके इत्यादी गु.रं.नं.९४/२०२६ या गुन्हयाच्या कामी जप्त असून सदरचा मुद्देमाल न्यायालयात चौकशीवेळी आवश्यक असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदरील मुद्देमाल हे गुन्हयातील महत्वाचा पुरावा आहे. जप्त मुद्देमाल आणि मागणी केलेला मुद्देमाल याच्यामध्ये तफावत आहे. प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा असे कथन केले आहे. तपासी अंमलदार यांनी निशाणी ०५ ला म्हणणे दाखल करुन १० ग्रॅम–सोन्याची अंगठी, ५ ग्रॅम–सोन्याची अंगठी, ९ ग्रॅमचे– सोन्याचे झुमके इत्यादी मुद्देमाल जप्त केलेला असून सदर मुद्देमाल अर्जदार यांचा

मालकी हक्क तपासुन परत देण्यास हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे.

४. अर्जदाराने कथन केलेला सोन्याच्या खरेदीची पावती तसेच एफआयआरची छायांकित प्रत इत्यादी प्रती दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रे तपासली. निशाणी ४ सोबत दाखल केलेली अनु.क्र.१ च्या खरेदी पावतीवरुन ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी दि.११.१२.२०१२ रोजी अर्जदाराने खरेदी केल्याचे दिसून येते. अनु.क्र.२ ला झुमके खरेदीची पावती आहे, तर अनु.क्र.३ ला प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या दोन अंगठ्या खरेदी केल्याच्या पावत्या दिसून येत आहेत. सदर दोन्ही पावतीमधील दागिने दि.०२.०१.२०२४ व ०४.११.२०२४ रोजी खरेदी केलेले आहे असे दिसून येते. सदर पावतीमध्ये खरेदी केलेला दागिन्याची सविस्तर वर्णन दिलेले नाही. पावती नं.३ नुसार ५ – ५ ग्रॅमच्या दोन अंगठ्या दत्ता कांबळे यांनी खरेदी केल्या आहेत. दत्ता कांबळे हे त्या अंगठ्यांचे खरेदीदार असल्याचे दिसून येते. सदर तफावतीबाबत शंका उपस्थित केल्यानंतर अर्जदारने पुन्ही एक पावती दाखल केली आहे. त्या पावतीमध्ये १० ग्रॅमची एक अंगठी असा उल्लेख केला आहे. सदर दोन्ही पावत्यांचे अवलोकन करता सदर अंगठीचा वर्णनाबाबत आणि अर्जदार त्याची खरेदीदार असल्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. याशिवाय सदर दोन्ही पावत्या या जी.एस.टी. बिलाच्या नाहीत. त्याच्यावर खरेदी घेणा–याची सही नाही. ज्या सोनाराकडून खरेदी केले त्याचा शिक्का आणि सही सदर पावत्यांवर दिसून येत नाही. त्यामुळे सदर पावत्यांच्याबाबत तसेच अर्जदारने ते दागिने खरेदी केले याबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे अशा परिस्थीतीत सदर मुद्देमाल अर्जदाराला परत करणे योग्य वाटत नाही. अनु.क्र.१ च्या पावतीवरुन ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी अर्जदारने खरेदी केल्याचे दिसून येते. मुद्देमाल जप्त ५ ग्रॅमच्या अंगठीबाबत कोणीही मागणी केलेली नाही. सदर अंगठी अर्जदार यांच्याच मालकिची आहे असे दिसून येते. त्यामुळे जप्त केलेल्या मुद्देमालापैकी केवळ ५ ग्रॅमची अंगठी

अर्जदारांना त्याची मालकी पाहुन परत करता येईल. परंतु १० ग्रॅम अंगठी, ९ ग्रॅम– झुमके याच्या मालकीबाबत संभ्रम आहे. त्याचबरोबर १५ ग्रॅमचे–सोन्याचे मिनी गंठण, १ तोळा–सोन्याचे लॅाकेट, २ ग्रॅम– कानातील टॅापस, २ ग्रॅम– सोन्याचे सरपाळे आणि ७ ग्रॅम– सोन्याचे मनीमंगळसुत्र हा मुद्देमाल जप्त दिसून येत नाही.

५. जप्त केलेल्या मुद्देमालापैकी ५ ग्रॅमची अंगठी ही दाखल खरेदी पावती नुसार अर्जदारच्या मालकिची आहे असे दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये मागणी केलेल्या मुद्देमालपैकी ५ ग्रॅम वजनाची अंगठी अर्जदाराच्या मालकीचे आहे असे दिसून येते. सबब, सदर अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने मी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज खालीलप्रमाणे अंशतः मंजूर करणेत येत आहे.

**२.** तपासी अंमलदार यांनी सदर गु.रं.नं.९४/२०२६ मधील जप्त मुद्देमालपैकी ५ ग्रॅम वजनाची अंगठी अर्जदार सुधा मारुती वाघमारे यास पुढे नमुद अटींची पुर्तता केलेनंतर परत दयावे.

**अ.** अर्जदाराने न्यायालयात रक्कम रू.५०,०००/–रूपयेचे क्षतीपूर्ती बंधपत्र (Indemnity Bond) दयावे.

**ब.** अर्जदाराने त्याचे ओळखपत्र तसेच त्याच्या रहिवासाचा पुरावा, खरेदी पावती संबंधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल कराव्यात. सदर बाबत संबंधीत अधिकारी यांनी खात्री करावी.

**क.** सदर मुद्देमाल म्हणजेच ५ ग्रॅम वजनाची अंगठी न्यायालयाच्या परवानगीशिवाय विक्री वा अन्यप्रकारे विल्हेवाट लावणार नाही तसेच न्यायालयाच्या

हुकूमाप्रमाणे आवश्यक तेव्हा सदरचे मुद्देमाल न्यायालयात हजर करणेची, त्याचप्रमाणे सदरचे मुद्देमालाचा अवैध व्यवसायासाठी वापरणार नसल्याबाबत व सदरचा मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचा नसल्याचे निष्पन्न झालेस त्याची किंमत न्यायालयात भरणेस तयार असलेबाबत हमीपत्र संबधीत तपासी अधिकारी यांचेकडे दाखल करावे.

**ड.** संबंधीत तपासी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेल्या मुद्देमालाचे रंगित छायाचित्र घेवून ते या मुद्देमालाचेच आहे याबाबत खात्री करून घ्यावी व तसा शेरा फोटोच्या मागे नमुद करावा.

**इ.** सदर बाबींची पुर्तता झालेवर संबंधीत अधिकारी यांनी सदरील मुद्देमालाबाबतचा फोटो, नोटांचे नंबर, पंचनामा तसेच रहिवासी पुरावा आणि ओळखपत्र तसेच वर नमुद हमीपत्र या न्यायालयात दोषारोपपत्रासोबत पाठवावे.

**३.** या अटी व शर्तींची पुर्तता तसेच कागदपत्रांची योग्य ती पडताळणी झालेनंतरच अर्जदारास मुद्देमाल पाटल्या परत दयावे.

**४.** प्रस्तुत आदेशाची एक प्रत आणि अर्जदाराचे क्षतीपूर्ती बंधपत्र सदर गुन्हयातील एफ.आय.आर. सोबत ठेवणेकामी संबंधीताकडे सुपुर्द करावा.

**५.** सदरचे क्षतीपुर्ती बंधपत्र अर्जदाराने दाखल केल्यानंतर मुद्देमाल परत करण्याबाबतचे पत्र पाठविणेत यावे.

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.12 12:01:30 +0530

दिनांक – ११/०६/२०२६. **(श्रीमती ए. एस. गुंजवटे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रं.१,

निलंगा.